शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०७/२०२१

| | |
|---|---|
| श्री.अनिल भानुदास कवडे | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | |
| १. सरस्वती शिंदे शिक्षण संस्था, कोल्हापूर<br>२. डी.डी.शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर<br>अंबाबाई मंदीराजवळ, कोल्हापूर. | वि.प. |

सरस्वती शिंदे शिक्षण संस्था, कोल्हापूर यांचे डी.डी.शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर यांचेकडील सहयोगी प्राध्यापक श्री.अनिल भानुदास कवडे विषय-अकौन्टंन्सी व संख्याशास्त्र यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०९/०८/२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

माझी नेमणूक या महाविद्यालयात दि.२०/०६/१९९२ रोजी झाली. सदर नेमणूकीस विद्यापीठाने नेट/सेट परिक्षा उत्तीर्ण होणेच्या अटीवर चेंजिस इन स्टाफ ची मान्यता दिली. जून १९९५ मध्ये मी सेट या परिक्षा उत्तीर्ण झालो. शिवाय विद्यापीठाने त्यांच्या दि.०४/०६/२००१ च्या पत्राने शासन निर्णय दि.२२/१२/१९९५ नुसार मला नेट/सेट परिक्षेतून सूट दिली व तसे महाविद्यालयास कळवले. तथापि विद्यापीठाने पूर्वीच दिलेल्या माझ्या चेंजिस इन स्टाफ मान्यतेमध्ये नेट/सेट ची अट आहे तशी आजपर्यंत कायम आहे. महाविद्यालयाने माझ्या चेंजिस इन स्टाफ मान्यतेमधील नेट/सेट ची अट काढून चेंजिस इन स्टाफ मान्यता घेणे कामी सन २०१३ पर्यंत काहीच कार्यवाही केली नाही. नेट/सेट ची अट काढून चेंजिस इन स्टाफ ची मान्यता घेणे कामी महाविद्यालयाने विद्यापीठाशी सन २०१३ मध्ये केलेल्या पत्रव्यवहारात विद्यापीठाने महाविद्यालयास सदर प्रकरणी विलंब झाल्यामुळे रू.९०००/- विलंब दंड आकारला. सदर दंड मी भरावा या आशयाचे पत्र महाविद्यालयाने मला दिले. सदर दंड महाविद्यालयास आकारला गेला असल्याने तो भरणेस मी नकार दिला. परत सन २०२० मध्ये महाविद्यालयाने माझी चेंजिस इन स्टाफ ची नियमित मान्यता (नेट/सेट ची अट काढून) घेणे कामी विद्यापीठाशी केलेल्या

पत्रव्यवहारात विद्यापीठाने महाविद्यालयास रू.१८०००/- विलंब दंड आकारला. महाविद्यालयाने त्यांचे दि.०९/०२/२०२१ चे पत्राने सदर दंड मला आकारला आहे असे मला कळवून सदर दंड रक्कम महाविद्यालयात जमा करणे विषयी मला कळविले. तथापि शिक्षकांच्या चेंजिस इन स्टाफ मान्यता घेणे हे महाविद्यालयाचे काम असल्यामुळे व सदर प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या विलंबास मी कोणत्याही प्रकारे जबाबदार नसल्यामुळे विद्यापीठाने महाविद्यालयास केलेला दंड रू.१८०००/- मला आकारणे हे योग्य व न्यायाचे नाही. सबब विद्यापीठाने महाविद्यालयास आकारलेला विलंब दंड मला न आकारता माझी चेंजिस इन स्टाफ ची नियमित मान्यता (नेट/सेट ची अट काढून) विद्यापीठाकडून मिळवणे विषयीचे आदेश महाविद्यालयास द्यावेत ही विनंती.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. श्री.ए.बी.कवडे यांची नियुक्ती या महाविद्यालयामध्ये दि.२०/०६/१९९२ रोजी नेट/सेट पास होण्याच्या अटीवर शिवाजी विद्यापीठाने त्यांना जा.क्र.आ.फा.१७८/टे/८५७९ दि.१०/११/१९९५ च्या पत्राने अट क्रं.एनबी-३ डी ची अट घालून मान्यता दिली.

२. श्री.ए.बी.कवडे हे या महाविद्यालयामध्ये अधिव्याख्याता म्हणून रूजू होण्यापूर्वी स.ब.खाडे कॉलेज कोपार्डे, ता.करवीर येथे जून १९८९ ते जून १९९२ या कालावधीसाठी अर्धवेळ अधिव्याख्याता म्हणून कार्यरत होते. श्री.ए.बी.कवडे यांनी महाविद्यालयातील नियुक्ती वेळी घतलेल्या एन.बी.३ डी अटीतून सूट मिळवण्यासाठी स.ब.खाडे महाविद्यालय येथील मान्यतेच्या प्रती महाविद्यालयामार्फत विद्यापीठाला सादर करून विद्यापीठाकडून नेट/सेट अटीतून सूट मिळविली आहे. सोबत जा.क्र.ॲफि.टे/१८१४ दि.०४/०६/२००१

३. त्यानंतर दि.०४/०६/२००१ च्या पत्रान्वये श्री.ए.बी.कवडे यांना विद्यापीठाने नेट/सेट अटीतून सूट दिली त्याबद्दलचे आणखी एक सर्वांसाठीचे पत्र सदंर्भ क्रं. ॲफि.टी-५/जन/८०९ दि.२६/०२/१९९६ सदर अटीतून सूट मिळाल्यानंतर, श्री.ए.बी.कवडे यांनी आपला चेंजिस इन स्टाफ प्रस्ताव महाविद्यालयाकडे पुनश्चः नेट/सेट अटीतून सूट मिळण्याबद्दलच्या मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक होते. पण त्यांनी तो सादर केला नाही. दि.०४/०६/२००१ च्या पत्राची प्रत विद्यापीठाने श्री.ए.बी.कवडे यांना सुध्दा वैयक्तिक पाठविली आहे. नेट/सेट अटीतून सूट मिळवणे यासाठी पूर्वी कार्यरत असणा-या महाविद्यालयातून मान्यता पत्रे आणून या महाविद्यालयाकडे सादर करणे व त्या अनुषंगाने या महाविद्यालयामध्ये नियुक्ती वेळी घालण्यात आलेली अटीतून सूट मिळवणे या पूर्ण प्रक्रियेमध्ये प्रशासकीय प्रक्रिया राबवताना श्री.ए.बी.कवडे यांनी आपले पूर्ण योगदान दिलेले आहे. त्यामुळे

अधिव्याख्याता म्हणून त्यांच्या मान्यतेसाठी घालण्यात आलेली नेट/सेट अट वगळण्यात आल्यानंतर श्री.ए.बी.कवडे यांनी चेंजिस इन स्टाफ प्रस्ताव महाविद्यालयाकडे सादर करणे आवश्यक होते तो त्यांनी सादर केला नाही.

४. श्री.ए.बी.कवडे यांनी या सर्व प्रक्रियेनंतर आपला 'चेंजिस इन स्टाफ' सप्टेंबर २०१२ मध्ये सादर केला. सदर प्रस्तावावर विद्यापीठाने विलंब आकार ९०००/- आकारला होता. महाविद्यालयाने आपले पत्र क्रं. डीडीएस/फा०९/२२४/२०१२-२०१३ दि.०६/०२/२०१३ अन्वये महाविद्यालयामार्फत विद्यापीठाला विनंती करण्यात आलेली होती.

५. श्री.ए.बी.कवडे यांनी एसयु/संलग्नता/टे-३ एसडीएस/१५४८ दि.१५/०६/२०२० अन्वये चेंजिस इन स्टाफ मान्यता घेण्याबद्दल महाविद्यालयाने शिक्षकांच्या निदर्शनास आणावे असे निर्देश विद्यापीठाने दिलेले आहेत. त्यामुळे महविद्यालयाने वरील संदर्भीय पत्रासह नोटीस काढून सदर बाब महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना निदर्शनास आणून दिली होती. सदर विद्यापीठाच्या पत्राच्या अनुषंगाने श्री.ए.बी.कवडे यांनी आपला चेंजिस इन स्टाफ प्रस्ताव मान्यतेसाठी महाविद्यालयाकडे सादर केला आहे. प्रशासकीय पातळीवर श्री.ए.बी.कवडे यांचा सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवला हे त्यांचे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नाही. सदर प्रस्ताव विद्यापीठाकडे रीतसर मान्यतेसाठी रू.१०००/- च्या फी सह सादर केल्यानंतर विद्यापीठाने सदर प्रस्तावावर विलंब आकार रू.१८०००/- आकारला आहे. श्री.ए.बी.कवडे यांच्या म्हणण्याप्रमाणे महाविद्यालयाने त्यांच्या प्रस्तावावर कोणताही दंड आकारलेला नाही. असा दंड आकारण्याबदद्ल महाविद्यालयाला कोणतेही अधिकार नाहीत. दि.१७/०२/२०२१ ने दिलेले निवेदन वस्तुस्थितीच्या विसंगत असून त्यांनी केलेल्या आरोपात कोणतेही तथ्य नाही. याबदद्ल श्री.ए.बी.कवडे यांना कळविले आहे.

६. विद्यापीठ, महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांशी पत्रव्यवहार हा महाविद्यालयामार्फत करीत असते. विद्यापीठ वैयक्तिक पातळीवर महाविद्यालयाच्या कर्मचा-यांशी पत्रव्यवहार करीत नाही. या प्रकरणामध्ये विद्यापीठाने चेंजिस इन स्टाफ बदद्लचा पत्रव्यवहार श्री.ए.बी.कवडे यांच्याशी महाविद्यालयामार्फत केला आहे.

७. विद्यापीठाने एसयु/संलग्नता/टे-३/एस.डी.एन/१५४८ दि.१५/०६/२०२० अन्वये शिक्षकांनी चेंजिस इन स्टाफ मान्यता घेण्याबद्दल कळविले आहे. त्याप्रमाणे श्री.ए.बी.कवडे यांनी चेंजिस इन स्टाफ प्रस्ताव सादर केला आहे. सदर पत्रात विद्यापीठाने कोणी प्रस्ताव सादर करावा व विलंब आकाराबद्दल स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे विलंब आकार महाविद्यालयाने चेंजिस इन स्टाफ मान्यता

घेण्याबदद्ल विलंब केलेला नाही. ज्या ज्या वेळी त्यांनी चेंजिस इन स्टाफ प्रस्ताव सादर केलेले आहेत त्या त्या वेळी त्यावर महाविद्यालयाने प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.

८. श्री.ए.बी.कवडे यांनी महाविद्यालयाने दंड आकारला आहे असे म्हणणे सादर केलेले आहे. हे पूर्णपणे चुकीचे व वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहे. श्री.ए.बी.कवडे हे शिक्षण क्षेत्रात गेली ३० वर्षे कार्यरत आहेत. व सहयोगी प्राध्यापक म्हणून या महाविद्यालयात सध्या कार्यरत आहेत. इतक्या अनुभवी व्यक्तिने चेंजिस इन स्टाफ मान्यतेबद्दल वस्तुस्थितीचे अवलोकन चुकीच्या पध्दतीने करून सर्व प्रकरणांची इत्थंभूत माहिती असताना आपण कार्यरत असणा-या महाविद्यालयाच्या प्रशासनावर व प्राचार्यांवर चुकीच्या पध्दतीने गंभीर आरोप करणे हे संयुक्तिक नाही.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार यांचे कथनानुसार त्यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने विद्यापीठाने त्यांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीवर चेजिंस इन स्टाफ मान्यता दिली आहे. तथापि विद्यापीठाच्या दि.०४/०६/२००१ रोजीच्या पत्राने शासन निर्णय २२/१२/१९९५ नुसार तक्रारदार यांना नेट/सेट परीक्षेतुन सुट देऊन त्यानुसार महाविद्यालयास कळविले. सबब पूर्वी चेजिंस इन स्टाफ मान्यतेमध्ये घातलेली अट काढलेली नसलेने ती काढुन घेण्याची जबाबदारी महाविद्यालयाची असल्याचे समितीसमोर मांडले आहे. याउलट संस्था महाविद्यालयाने त्यांचे लेखी म्हणणे सादर केले असुन त्यांचे कथनानुसार चेजिंस इन स्टाफची अट काढुन घेणे करिता चेजिंस इन स्टाफ प्रस्ताव महाविद्यालयात सादर करण्याची जबाबदारी तक्रारदार यांची होती ज्या ज्या वेळी तक्रारदार यांनी चेजिंस इन स्टाफ प्रस्ताव सादर केला आहे, त्या त्या वेळी महाविद्यालयाने प्रक्रिया पूर्ण केलेली असल्याचे कथन केले आहे.

समितीने दोन्ही पक्षाचे लेखी व तोंडी कथन व सादर केलेली कागदपत्रे अवलोकनी घेतली. तक्रारदार यांच्या कथनानुसार शिक्षकांच्या चेजिस इन स्टाफची मान्यता घेणे हे महाविद्यालयाचे काम आहे व त्यास विलंब झाला असलेने त्यास महाविद्यालाचे प्राचार्य जबाबदार आहेत. समितीने तक्रारदार यांनी सादर केलेली कागदपत्रे अवलोकनी घेतली असता, तक्रारदार यांना नेट/सेट परीक्षेस सूट मिळालेल्या दिनांकापासून ते सन २०१३ पर्यंत महाविद्यालयास या अनुषंगाने पत्रव्यवहार केलेबाबत कागदपत्रे सादर केलेली नाहीत. सन २००१ ते २०१३ पर्यंतच्या कालावधीमध्ये तक्रारदार यांनी या अनुषंगाने संस्था, महाविद्यालय यांचेकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक होते असे या समितीचे मत आहे. सन २०१३ मध्ये तक्रारदार यांचा चेजिस इन स्टाफ प्रस्ताव सादर केला होता व त्यावर विद्यापीठाने विलंब दंड आकारलेने प्रस्तावाच्या पुष्ठार्थ पुढील पूर्तता झाली नसल्याचे प्राप्त कागदपत्रांवरून दिसून येते. त्यानंतरही सन

२०२० पर्यंत याबाबत महाविद्यालय अथवा तक्रारदार यांचेमध्ये याबाबत पत्रव्यवहार झालेला दिसून येत नाही.

विद्यापीठाने चेंजिस इन स्टाफ मान्यतेबाबत एसयु/संलग्नता/टे३/एसडीएम/१५४८ दि.१५/०६/२०२० रोजीचे परिपत्रक काढले. त्यास अनुसरून महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना आपला प्रस्ताव सादर करणेची बाब निदर्शनास आणण्यात आल्याचे दिसून येते. तथापि विद्यापीठाने त्यांचे कडील कार्यालयीन परिपत्रक दि.१४ सप्टेंबर २००४ नुसार श्री.कवडे यांच्या चेंजिस इन स्टाफ बाबत महाविद्यालयास विलंब आकार आकारलेचे दिसून येते. महाविद्यालय प्रतिनिधी यांच्या कथनानुसार जरी तक्रारदार यांचा चेजिस इन स्टाफ प्रस्तावाबाबत सन २०१३ मध्ये कार्यवाही केलेचे नमूद केले असले तरी सादर केलेल्या कागदपत्रानुसार तक्रारदार यांचा प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर केल्यानंतर विद्यापीठाने दि.०९/०१/२०१३ रोजीचे विलंब आकारणीचे पत्र महाविद्यालयास पाठविलेचे दिसून येते. तसेच त्या पत्राचे अनुषगांने महाविद्यालयाने तक्रारदार यांना दि.१५/०१/२०१३ रोजीच्या पत्राने कळविलेचे दिसून येते. त्यानंतर महाविद्यालयाने दि.०६/०२/२०१३ रोजीचे पत्राने विद्यापीठाकडे श्री.कवडे यांच्या प्रस्तावाबाबत विलंब आकार माफ करण्याबाबत कळविलेचे दिसून येते. परंतू त्याउलट विद्यापीठाने त्याबाबत काय कार्यवाही केली यासंबंधी कागदपत्रे दिसून येत नाहीत. तथापि विद्यापीठाने एसयु/संलग्नता/टे३/एसडीएम/१५४८ दि. ०५/०६/२०२० रोजीचे परिपत्रक काढल्याचे दिसून येते. या अनुषंगाने महाविद्यालयाने तक्रारदार यांचा प्रस्ताव पुनश्चः विद्यापीठाकडे सादर केला त्यावेळेस विद्यापीठाने विलंब आकारणी रक्कम नमूद करून महाविद्यालयास दि.०४/०२/२०२१ रोजीच्या पत्राने कळविले. सन २०१३ ते सन २०२० मधील विद्यापीठ विलंब आकारणी पत्र अवलोकनी घेता विलंब आकाराची रक्कम वाढून रू.१८०००/- झालेची दिसून येते. ही सर्व झालेली कार्यवाही अवलोकनी घेतली असता विद्यापीठाने वेळोवेळी याबाबत प्रसिध्द केलेल्या परिपत्रकांच्या अनुषगांने महाविद्यालयाचे प्राचार्य यांचेकडून त्या त्या वेळेस आवश्यक कार्यवाही झालेचे दिसून येत नाही.

महाविद्यालयाने तक्रारदार यांचा चेंजिस-इन-स्टाफचा प्रस्ताव सन २०१२ मध्ये पाठविण्यात आल्यानंतर विद्यापीठाने विलंब आकाराचे पत्र पाठविले. त्यास अनुसरून महाविद्यालयाने तक्रारदार यांना विलंब आकार भरण्याबाबत कळविले. तक्रारदार यांनी त्यास नकार दिल्यानंतर महाविद्यालयाने विद्यापीठाकडे विलंब आकार माफ करण्याबाबत कळविले. तथापि सन २०१३ पासून विद्यापीठ स्तरावर विलंब माफीबाबत काय कार्यवाही झाली अथवा महाविद्यालयाकडून याबाबत पत्राने विद्यापीठाकडे कोणताही पाठपूरावा, पत्रव्यवहार केलेचे दिसून येत नाही. सबब तक्रारदार यांच्या चेंजिस इन स्टाफची मान्यता घेणेबाबत विद्यापीठाकडे पाठपूरावा करणेकामी महाविद्यालयाकडून दिरंगाई झालेचे दिसून येते.

संलग्नता विभागाकडून प्राप्त माहितीनुसार दि.२२/०७/१९९६ रोजीच्या परिपत्रकामध्ये 'महाविद्यालयात शिक्षकांच्या नेमणूका निवड समितीमार्फत झाल्यानंतर त्यांना विद्यापीठाकडून मान्यता दिली जाते व मान्यता दिलेल्या पत्रातील शेवटच्या परिछेदामध्ये शिक्षक हजर झाल्यानंतर तात्काळ त्यांचा चेंजिस-इन-स्टाफ फॉर्म भरून पाठवून त्यास मान्यता घ्यावी असे कळविले जाते. परंतू ब-याच महाविद्यालयाकडून फॉर्म पाठवून मान्यता घेतली जात नाही असे निदर्शनास आले आहे. तेंव्हा शिक्षकांचे फॉर्म योग्य त्या कागदपत्रांसह ज्या त्या वेळीच पाठवून मान्यता घ्यावी असे नमूद केल्याचे दिसते.' उपरोक्त परिपत्रकाव्द्रारे विद्यापीठाकडून चेंजिस इन स्टाफची मान्यता घेणेबाबत वेळोवेळी महाविद्यालयास कळविल्याचे दिसून येते. तसेच दि. १४ सप्टेंबर २००४ च्या परिपत्राकामध्ये खालील मजकूर नमूद आहे. "संलग्न महाविद्यालयात रितसर निवड समितीमार्फत व स्थानिक निवड समिती मार्फत शिक्षकांच्या नेमणूका झाल्यानंतर सदरच्या अहवालांना विद्यापीठाकडून मान्यता दिली जाते. मान्यता मिळालेले शिक्षक हजर होताच त्याची माहिती चेंजिस-इन-स्टाफ फॉर्ममध्ये भरून योग्य ती कागदपत्रे त्याच्या सोबत जोडून अशी प्रकरणे विद्यापीठाकडे पाठवून चेंजिस-इन-स्टाफ फॉर्मला विद्यापीठाची मान्यता घ्यावी असे वारंवार पत्रांव्द्रारे तसेच प्रत्येक निवड समिती अहवाल मान्यता पत्राव्द्रारे कळवूनही अनेक महाविद्यालयांनी अशा नियुक्त्यांना मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही. अशा प्रकरणी प्रत्येक वर्षासाठी रू.१०००/-दंडाची आकारणी करून मान्यतेबाबत कार्यवाही केली जाते. आता दि.०९ जुलै, २००४ च्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीपुढे चेंजिस-इन-स्टाफ समितीचा अहवाल विचारार्थ सादर केला असता दि.३० ऑक्टोंबर, २००४ पर्यंत असे फॉमर्स प्रत्येक प्रकरणासाठी रू.१०००/-अशा एकत्रित शुल्कासह स्वीकारण्याचा निर्णय झाला असून ही सवलतीची शेवटची संधी आहे. त्यानुसार दि.३० ऑक्टोंबर,२००४ पर्यंत येणा-या परिपुर्ण फॉर्मला रू.१०००/-नाममात्र भरावे लागतील. त्यानंतर मात्र पुर्वीप्रमाणे प्रत्येक फॉर्मला प्रत्येक वर्षाला रू.१०००/- दंड आकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी. तरी आपल्या महाविद्यालयातील ज्या शिक्षकांचे अद्याप चेंजिस-इन-स्टाफ फॉर्म पाठवून मान्यता घेतली नसेल त्यांचे फॉर्म परिपूर्ण माहितीसह व योग्य त्या कागदपत्रांसह पाठवून द्यावेत. प्रस्तावासोबत रू.१०००/-चा राष्ट्रीयकृत बॅंकेचा डिमांड ड्राफ्ट वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या नावे काढून तो जोडणे आवश्यक आहे. या बाबतीत जर पूतर्ता करण्यात आली नाही तर संबधित प्राचार्य त्यासाठी जबाबदार राहतील, याचीही संबधितांनी कृपया नोंद घ्यावी." अशा प्रकारे विद्यापीठाचे विस्तृत परिपत्रक असताना देखील महाविद्यालय व शिक्षक यांनी याबाबत आवश्यक कार्यवाही केली नसल्याचे किंवा याबाबत कागदपत्रे सादर केलेचे दिसून येत नाही.

उपरोक्त परिपत्रक अवलोकनी घेता महाविद्यालयीन शिक्षकांचे चेंजिस इन स्टाफ फॉर्म पाठवून मान्यता घेण्याची जबाबदारी संबधित प्राचार्यांची असल्याचे समितीच्या निदर्शनास येते. तसेच विद्यापीठाने महाविद्यालयावर बसविलेला दंड तक्रारदाराकडून कोणत्या प्रावधाना अंतर्गत वसूल करण्याचा आदेश काढण्यात आला याचे स्पष्टीकरण महाविद्यालयाने दिलेले नाही. या प्रकरणी विद्यापीठाने महाविद्यालयास केलेला दंड महाविद्यालयाने तक्रारदार यांचेकडून वसूल न करता सदर दंडाची रक्कम महाविद्यालयाने विद्यापीठाकडे भरून तक्रारदार यांच्या चेंजिस इन स्टाफची मान्यता घेणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. करिता समिती खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

वि.प. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी या आदेशाचे तारखेपासून एक महिन्याच्या आत विद्यापीठाने बसविलेल्या दंडाची रक्कम विद्यापीठाकडे भरून तक्रारदार यांची चेंजिस इन स्टाफ ची नियमित मान्यता (नेट/सेट ची अट काढून) घेणेबाबतची योग्य ती कार्यवाही करावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 2 6 MAY 2023

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
( डॉ.एस.पी.हंगिरगेकर )

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोळेकर )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)